**CNR No.MHSI010011572018**

**नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. १७६/२०१८ (यशवंत वासुदेव तेली वगैरे– पुनर्वादी वि. नारायण यादव (मयत) तर्फे वारस– अशोक नारायण यादव वगैरे– उत्तरवादी) मधील नि. ७ वरील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज पुनर्वादींनी विद्वान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कणकवली यांनी रे.दि.मु. नं. २१/२००९ मध्ये दि. १९/१०/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयास व हुकूमनाम्याला पुनर्वाद प्रलंबन काळात स्थगिती मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदरचा अर्ज पुनर्वादविषयांकीत न्यायनिर्णयामध्ये पुनर्वादींना आदेशापासून १५ दिवसांचे आत दावा मिळकतीचा ताबा उत्तरवादींना द्यावा असे निर्देश असून त्यास स्थगिती न दिल्यास पुनर्वादींचा समूळ हेतू नष्ट होणार आहे. त्यामुळे पुनर्वादींचा मिळकतीवरील ताबा सुध्दा जाण्याची शक्यता असून उत्तरवादींनी सदरच्या न्यायनिर्णयाचे आधारावर नियमित दरखास्त क्र. २/२०१९ दाखल केली असून त्यामध्ये केव्हाही पुनर्वादींचे विरुध्द हुकूम होवू शकत असल्याची रास्त भिती असल्यामुळे सदरचा स्थगिती आदेश आवश्यक असल्याच्या मुद्यावर दाखल केला आहे.

३. सदरचे अर्जास उत्तरवादी क्र. १ यांनी नि. १८ व्दारे लेखी हरकत नोंदविली असून पुनर्वादींनी स्वतः केलेल्या चुकीबद्दल न्यायालय अथवा कायदा त्याचे संरक्षण करु शकत नाही, स्थगिती आदेश दिल्यास उत्तरवादी त्यांच्या न्याय्य हक्काच्या उपभोगापासून उपेक्षित राहणार आहे व दाव्याचा मूळ हेतू साध्य होण्यास विलंब लागणार आहे या मुद्यावर दाखल केला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात पुनर्वादींतर्फे विधिज्ञ श्री. डी.ए.अंधारी यांचा तर उत्तरवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.बी.दळवी यांचा युक्तिवाद ऐकला.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. पुनर्वादींनी सकृतदर्शनी पुनर्वाद शाबीत केला आहे काय ? | ...होकारार्थी. |
| २. न्यायाचा समतोल कोणाचे बाजूने झुकतो ? | ... पुनर्वादीचे बाजूने. |
| ३. अर्ज नामंजूर झाल्यास कोणाचे जास्त नुकसान होणार आहे ? | ....पुनर्वादीचे. |
| ४. आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ३ बाबत –</u>

५. प्रस्तुत पुनर्वादाचा विषय असणा–या न्यायनिर्णयाव्दारे पुनर्वादींनी दावा मिळकतीचा दावा उत्तरवादींना आदेशापासून १५ दिवसांचे आत देण्याचा आदेश विद्वान सुनावणी न्यायालयाने दिल्याचे, तसेच सदरहू न्यायनिर्णयाचे आधारे उत्तरवादींनी पुनर्वादींविरुध्द दरखास्त दाखल केल्याचे उभयपक्षी मान्य आहे. तसेच पुनर्वादाचे मुद्दे पाहता प्रस्तुतचा पुनर्वादात पुनर्वादींना यश मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात दरखास्त दाखल असल्यामुळे उत्तरवादी पुनर्वादविषयांकीत न्यायनिर्णयास स्थगिती न दिल्यास दरखास्तीची अंमलबजावणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे पुनर्वादींचे अपरीमित नुकसान होणार आहे. कारण तांत्रीक मुद्यावर पुनर्वादी स्वतःच्या न्याय्य मागण्यांच्या हक्काला मुकणार आहेत. उलटपक्षी उत्तरवादींचे वादग्रस्त आदेशास स्थगिती दिल्यास केवळ प्रतिक्षा कालावधी वाढणार आहे. तथापि सदरहू बाबीचे निराकरण कालबद्ध सुनावणीच्या निर्देशामुळे होणार आहे. सबब न्यायालय **मुद्दे क्र. १ ते ३ ची उत्तरे सकारात्मक** देत आहे.

### <u>मुद्दा क्र. ४ बाबत –</u>

६. प्रस्तुत प्रकरणात पुनर्वादींनी पुनर्वादविषयांकीत न्यायनिर्णयास पुनर्वाद प्रलंबन काळात स्थगिती मिळणेचा दावा सकृतदर्शनी शाबीत केल्यामुळे सदरचा अर्ज

मंजूर होणे आवश्यक आहे. तसेच उत्तरवादींचे हिताचा विचार करता त्या पुनर्वादाची अंतिम सुनावणी होणेकरीता ६ महिन्यांची कालमर्यादा घालून देणे आवश्यक आहे. सबब आदेश.

**<u>आदेश</u>**

१. पुनर्वादीचा स्थगिती अर्ज नि. ७ पुनर्वादींनी या पुनर्वादाची अंतिम सुनावणी या आदेशापासून ६ महिन्यांचे आत करण्याचे मुख्य अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. विद्वान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कणकवली यांनी रे.दि.मु.नं. २१/२००९ मध्ये दि. १९/१०/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयास व हुकूमनाम्याला पुनर्वाद प्रलंबन काळात स्थगिती देण्यात येते.

३. येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली करणेत येत आहे.

(शि. व. हांडे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस

दिनांकः– २१/०६/२०२२